Vol 6 Issue 2 August 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063


Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Dr. T. Manichander

## International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 2 | August - 2016

GRT Golden Research Thoughts

# जागतिकीकरणानंतर भारतातील स्थानिक स्वशासन संस्थांमधील आर्थिक स्थित्यंतरे

[1]अमोल तुकाराम खाडे, [2]डॉ. टी. जी. सिराळ
[1]अर्थशास्त्र (सेट व नेट) , डीएसजी ,सीनियर कॉलेज, मोहोळ ,जि. सोलापूर.
[2]सहयोगी प्राध्यापक,संशोधक मार्गदर्शक ,नागनाथ वरिष्ठ महाविदयालय,औंढा ( नागनाथ ), जि. हिंगोली.



## प्रस्तावना–

1991 नंतर भारतात आर्थिक सुधारणांचे पर्व सुरू झाले. त्यानुसार भारतात खाजगीकरण, उदारीकरण, जागतीकरण या धोरणांचा स्विकार करण्यात आला व या धोरणानुसार आर्थिक सुधारणा राबविण्यात आल्या. यामधील जागतिकीकरण ही एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. या जागतिकीकरणाच्या अंगीकारामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक प्रकारचे बदल घडून आहे. जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेतील उद्योग, व्यापार, सेवा, शेती या क्षेत्रांवर फार मोठा परिणाम झाला. भारतातील ग्रामीण–शहरी भागावरही परिणाम झाला. जागतिकीकरणाच्या काळात वाढते शहरीकरण, वाढती लोकसंख्या, त्यातून वाढत जाणारी प्राथमिक–मूलभूत सेवांची आवश्यकता यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या भूमिकेतही बदल झाला. जागतिकीकरणाचे स्थानिक स्वराज्य संस्थावरही परिणाम दिसून आले. जागतिकीकरणानंतर भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आर्थिक स्थित्यंतरे घडून आली.

## जागतिकीकरणाकडे वाटचाल :–

भारतातील 1990–91 मधील भारताच्या देण्याघेण्याच्या आढाव्यातील मोठी तूट आणि देशांतर्गत राजकीय अस्थिरता यामुळे गुंतवणूकदारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील विश्वास डगमगला आणि त्यामुळे भारतातील पुष्कळ भांडवल बाहेर गेले. भारतातील परकीय गंगाजळी जून 1991 मध्ये, फक्त 1.1 अब्ज डॉलर म्हणजे आयातीच्या दोन आठवड्याच्या गरजेपेक्षा कमी होती. भारताला कर्जावरील व्याजाचे देणे फेडणेही अशक्य झाले. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी भारताला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेकडे जाणे भाग पडले. या संस्थांनी मदत करताना भारतावर काही अटी लादल्या. त्यानुसार भारताला आर्थिक सुधारणा कराव्या लागल्या. त्यातील जागतिकीकरण हे बाह्य क्षेत्राच्या उदारीकरणाशी समकक्ष समजले जाते.

## जागतिकीकरण व स्थानिक स्वषासन संस्था :

सामाजिक–आर्थिक सेवांची पूर्तता करण्यात स्थानिक स्वशासन संस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. स्थानिक स्वशासन संस्था प्राचीन काळापासून आजपर्यंत त्यांचे अस्तित्व टिकवून आहेत. याचे कारण त्यांचा जनतेशी घनिष्ठ संबंध आहे. लोकांच्या स्थानिक गरजा, प्रश्न सोडवून त्यांना मूलभूत स्वरूपाच्या सेवा देण्याचे व स्थानिक प्रदेशाचा विकास घडवून आणण्याचे कार्य या संस्था करीत असतात. राष्ट्रीय नियोजन, कल्याणकारी राज्य, सामाज्यपादी समाजरचना व आर्थिक विकास यासारख्या संकल्पनांचा स्विकार केल्यामुळे वाढत्या जबाबदाऱ्या पूर्ण करणाऱ्या दृष्टिने स्थानिक स्वराज्य संस्थाचे महत्त्व सातत्याने वाढत असल्याचे दिसून येते.

जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांवर परिणाम झाले. त्यातून अर्थव्यवस्थेत अनेक बदल घडून आले. स्थानिक स्वशासन संस्थावरही जागतिकीकरणाचा परिणाम झाला. वाढती लोकसंख्या, वाढते शहरीकरण, या संदर्भात स्थानिक स्वशासन संस्थावर जागतिकीकरणाचा परिणाम दिसून आले. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर 1991 नंतर स्थानिक स्वशासन संस्थे मध्ये काही सामाजिक–आर्थिक बदल करण्यात आले. यातील स्वशासन संस्थामध्ये जे आर्थिक बदल / सुधारणा करण्यात आल्या. त्या महत्त्वपूर्ण समजल्या जातात. ज्यामुळे या स्थानिक स्वशासन संस्था मजबूत होऊन त्यांचा विकास घडून आला. जागतिकीकरणानंतर स्थानिक स्वशासन संस्थामध्ये जे बदल झाले, जी आर्थिक स्थित्यंतरे घडून आली ती पुढीलप्रमाणे पाहता येतील.

## 73–74 वी घटना दुरूस्ती अधिनियम :

स्थानिक स्वराज्य संस्थांचे विभाजन हे प्रामुख्याने दोन भागांत केले जाते. त्यानुसार ग्रामीण भागात स्थानिक स्वशासन संस्था व शहरी स्थानिक स्वशासन संस्था असे विभाजन केले जाते. ग्रामीण स्थानिक स्वशासनात प्रामुख्याने ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांचा समावेश होतो. तर नागरी स्वशासन संस्थामध्ये नगरपंचायत, नगर परिषद व महानगर पालिका यांचा समावेश होतो. ग्रामीण व शहरी भागातील लोकांना मूलभूत व प्राथमिक सेवा–सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम या स्थानिक स्वशासन संस्था करीत असतात.

1991 च्या आर्थिक सुधारणानंतर स्थानिक स्वशासन संस्थामधील दोष दूर करून त्यांचा विकास करण्यासाठी 1992 साली 73–74 वी घटना दुरूस्ती करण्यात आली. यातील 73 वी घटनादुरूस्ती ही ग्रामीण स्थानिक स्वशासन संस्था (पंचायतराज) संदर्भात होती. तर 74 वी घटनादुरूस्ती नागरी स्थानिक स्वशासन संस्था संदर्भात होती.

73–74 वी घटना दुरूस्ती अधिनियमातील तरतूदी :

### 1) त्रिस्तरीय रचना :

73 व्या घटनादुरूस्तीत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था रचना ग्रामपंचायत – पंचायत समिती – जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय रचना करण्यात आली. तर नागरी स्थानिक स्वशासन संस्थेची नगर पंचायत – नगर परिषद – महानगरपालिका अशी रचना करण्यात आली.

### 2) आरक्षणाबाबत तरतूद :

संविधनातील सामाजिक न्यायाचे तत्व प्रत्यक्षात आणण्यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इतर मागासवर्ग यांना लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा राखीव ठेवण्यात आल्या.

### 3) वित्तीय व्यवस्था :

73–74 वी घटना दुरूस्ती अधिनियमतील कलम 243 नुसार स्थानिक स्वशासन संस्थाच्या वित्तीय व्यवस्थेची जबाबदारी राज्य विधिमंडलावर सोपविण्यात आली आहे. घटकराज्याचे विधिमंडळ कायदा करून स्थानिक स्वशासन संस्थांचे कर आकारणी व कर वसुली संबंधीचे अधिकार निश्चित करेल. शिवाय स्थानिक स्वशासन संस्थांना राज्य संचित निधिमधून देण्यात येणाऱ्या अनुदाना संबंधीचे धोरण ठरवले जाईल.

### 4) राज्य वित्त आयोगाची तरतूद :

स्थानिक स्वशासनात संस्थांच्या आर्थिक स्थितीची समीक्षा करून त्यांची उत्पन्नाची साधने निश्चित करण्यासंबंधी राज्यपालाला शिफारशी करण्यासाठी घटनादुरूस्ती अधिनियमातील कलम 243 नुसार,'राज्य वित्त आयोगा'ची स्थापना करण्याची जबाबदारी राज्यपालावर निश्चित करण्यात आली. घटनादुरूस्तीच्या अंमलबजावणीपासून एक वर्षाच्या आत व त्यानंतर प्रत्येक पाच वर्षांनी राज्य वित्त आयोगाची स्थापना राज्यपाल करतील. हा आयोग स्थानिक स्वशासन संस्थांकडून आकारले जाणारे कर, राज्य सरकारच्या उत्पन्नातील स्थानिक स्वशासन संस्थाचा हिस्सा, राज्य संचित निधितून स्थानिक स्वशासन संस्थांना मिळणारे अनुदान आणि स्थानिक स्वशासन संस्थांची आर्थिक स्थिती सुधारणा, यासारख्या बाबी निश्चित करण्यासंबंधी राज्यपालाकडे आपला अहवाल सादर करेल. राज्यपाल हा अहवाल विधीमंडळासमोर ठेवतील व राज्य वित्त आयोगाची रचना, अधिकार व कार्ये राज्य विधिमंडळ कायद्याद्वारे निश्चित केले जातील.

### 5) हिशेब व हिशेब परीक्षण :

देशातील स्थानिक स्वशासन संस्थांच्या आर्थिक व्यवहाराचे नियीमत हिशेब ठेवून वेळोवेळी हिशेब परिक्षण (ऑडीट) करण्यासंबंधी आवश्यक ते कायदे तयार करण्यासंबंधीची जबाबदारी 73–74 वी घटना दुरूस्ती अधिनियमातील कलम 243 नुसार राज्य विधिमंडळावर टाकण्यात आली आहे. स्थानिक स्वशासन संस्थामधील आर्थिक गैरव्यवहारांना तसेच लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या खर्चाच्या उधळपट्टीला लगाम घालणे हा यामागचा प्रमुख उद्देश आहे.

### 6) जिल्हा नियोजन समितीची तरतूद :

ग्रामीण व नागरी स्थानिक स्वशासन संस्थांच्या विकास योजनांमध्ये एकसूत्रता निर्माण करून संपूर्ण जिल्ह्यासाठी एक सर्वसमावेशक विकास कार्यक्रम तयार करण्यासाठी 74 व्या घटनादुरूस्ती कायद्यातील कलम 243 नुसार प्रत्येक राज्यातील जिल्हा स्तरावर एक 'जिल्हा नियोजन समिती'ची तरतूउ करण्यात आली आहे. या समितीची रचना, सभासद संख्या, त्यांची निवडपद्धती, कार्याकाळ व अधिकार, काही निश्चित करण्यासंबंधीचे कायदे करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळास आहे.

## ग्रामीण – शहरी विकास व दारिद्रय निर्मूलन :

केंद्र शासन व राज्य शासन ग्रामीण शहरी विकासाच्या दारिद्रय निर्मूलनाच्या अनेक योजना स्थानिक स्वशासन संस्थांच्या माध्यमातून राबवित असतात. या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात स्थानिक स्वशासन संस्थांची भूमिका महत्वपूर्ण असते. जागतिकीकरणानंतर विविध योजनांची अंमलबजावणी करून ग्रामीण – शहरी भागाचा विकास करण्याचे काम स्थानिक स्वशासन संस्थांनी केले.

यानुसार, 1993 रोजी आश्वासित रोजगार योजना, 1997 मध्ये सुवर्णजयंती शहरी रोजगार, 1999 मध्ये सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, 2001–2002 साली प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना, 2006 मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, अशा विविध योजनांची अंमलबजावणी स्थानिक स्वशासना संस्थांच्या माध्यमातून करण्यात आली.

## ई–प्रशासन :

जागतिकीकरणाच्या काळात जग अधिकाधिक जवळ येत चालले आहे. संपर्काची विविध आधुनिक साधने–तंत्र विकसीत होत आहे. आधुनिक तंत्राचा वापर विविध क्षेत्रात केला जात आहे. स्थानिक स्वशासन संस्थामध्येही आधुनिक तंत्राचा वापर करण्यास सुरूवात झाली आहे. प्रशासकीय कामकाजात आधुनिक साधनांचा अवलंब केला जात आहे. संगणक, इंटरनेट, व्हिडीओ कॉन्फरन्सिंग या माध्यमातून स्थानिक स्वशासन संस्थामधील प्रशासकीय कामकाज केले जात आहे. ज्यामुळे स्थानिक स्वशासन संस्थांच्या प्रशासकीय कामकाजात गतिमानता येत आहे.

## समारोप :

जागतिकीकरणानंतर भारतीय अर्थव्यवस्थेत सामाजिक–आर्थिक बदल घडून आले. यानुसार स्थानिक स्वशासन संस्थामध्येही काही बदल–सुधारणा घडून आल्या. असे असले तरी जागतिकीकरणाच्या या काळात स्थानिक स्वशासन संस्था मध्ये अजूनही काही सुधारणा करणे आवश्यक आहे. ज्यामुळे स्थानिक स्वशासन संस्था अधिकाअधिक बळकट व कार्यक्षम होतील. त्यादृष्टिने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## संदर्भ सूची :

1) भारतातीन स्थानिक स्वशासन – प्रा. सतीश ठोंबरे
2) अर्थरंग – प्रा. ज. फा. पाटील
3) पंचायत राज आणि नागरी प्रशासन – अर्जुन दर्शनकार



अमोल तुकाराम खाडे
अर्थशास्त्र (सेट व नेट) , डीएसजी ,सीनियर कॉलेज, मोहोळ ,जि.सोलापूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org